कार्यालय पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

## प्रेसनोट

दिनांक १२.१२.२०१८.

**१) श्री.नेमीनाथ रंगनाथ कवडे, वय ५७ वर्षे, अभिलेखापाल, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, कळंब २) श्री. पंढरी विठ्ठल वाघमारे, वय ५४ वर्ष, शिपाई, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, कळंब यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन शिपाई श्री. पंढरी वाघमारे यांनी स्विकारल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली त्याची थोडक्यात हकिगत अशी की - तक्रारदार यांचे कसबे कळंब येथील जागेचे सिटी सर्वेचे टिपण, टोच नकाशा व चौकशी उताऱ्याची नक्कल देणेसाठी उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय कळंब येथील लोकसेवक श्री. नेमीनाथ कवडे, अभिलेखापाल व श्री.पंढरी वाघमारे, शिपाई हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विनय बहिर, पोलीस निरीक्षक यांनी तक्रारीची शहानिशा करुन श्री.आघाव, पोलीस निरीक्षक व अे.सी.बी. युनिट, उस्मानाबाद टीमच्या सहाय्याने सापळा रचुन आज दि. १२.१२.२०१८ रोजी लोकसेवक **१) श्री.नेमीनाथ रंगनाथ कवडे, वय ५७ वर्षे, अभिलेखापाल, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, कळंब** यांनी वर नमूद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन २) **श्री. पंढरी विठ्ठल वाघमारे, वय ५४ वर्ष, शिपाई, उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, कळंब** यांचे मार्फतीने **२००/- रुपये** लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सदरची लाचेची रक्कम ही उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, कळंब येथे कार्यालयाबाहेर दरवाजासमोर स्विकारण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम २०१८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. पुढील तपास श्री. विनय बहिर, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे **मोबाईल अॅप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, **टोल फ्री क्र. १०६४**, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

**प्रति,**

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

12/12/18

**(बी. व्ही. गावडे)**
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.

Scanned by CamScanner